REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2018

# मराठी ग्रामीण कवितेत मालवणीचे योगदान

**प्रा. डॉ. नामदेव विठ्ठल गवळी**
मराठी विभाग, आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वैभववाडी,
जिल्हा सिंधुदूर्ग, महाराष्ट्र.

ब-याच वर्षापूर्वी म्हणजे स्वातंत्र्यापूर्वी 1940 मध्ये वि. कृ. नेरूरकरांच्या 'उत्कंठा आणि इतर कविता' नावाच्या काव्यसंग्रहात मालवणी-कुडाळी या सिंधुदुर्गाच्या बोली भाषेतल्या चार कविता प्रसिध्द झाल्या होत्या. 'हिज मास्टर्स व्हाईस', या रेकॉर्डमुळे या कवितांना लोकप्रियताही मिळाली होती. या कवितांतुन अगदी पहिल्यांदा दक्षिण कोकणच्या लोकजीवनाचे चित्रण तेही बोलीभाषेच्या प्रभावी वापराद्वारे झाले होते. त्यानंतर वसंत सावंत, महेश केळुस्कर, अविनाश बापट यांनी मालवणी बोलीतुन बाबल्या आणि बेबल्याच्या प्रेमाची रोमँटीक गाणी लिहीली. पैकी सावंत आणि केळुस्कर यांनी स्टेजवरून सादरीकरण करून टाळ्या मिळवणे हेच प्रमुख उद्दीष्ट बाळगलेले दिसते. बापट यांनी मराठीचे मालवणी भाषांतर करावे, इतक्या सुमार 'मालवणी'ला कवितांतुन कोंबले. दादा मडकईकरांच्या कविता भाषेच्या वापराच्या अंगाने सुयोग्य असल्या तरी आशयाच्या बाबतीत मात्र कोकणी माणूस नजरेसमोर उभारण्यात त्या कमीच पडल्या. काहीअंशी ना. शि. परबांच्या बाबतीतही हेच म्हणावे लागते.

कवी किंवा लेखकांसमोर उभे राहणारे प्रश्न हे काळात निर्माण होणारे आणि काळाशी निगडीत असतात. माणसांच्या सामान्य जीवनावर या प्रश्नांचा परीणाम कधी तात्कालिक तर कधी दुरगामी होणारा असतो. हे जसे एका विराट प्रदेशात पसरलेल्या जनसमुदायासारखेच असतात. तसे ते मर्यादीत प्रदेशाविषयी सुध्दा असतात. मात्र या दोन्ही प्रकारच्या प्रश्नांमधून मानवी वृत्तीचा बरेवाईटपणाच प्रकट होत असतो. या प्रश्नांशी संघर्षरत असलेल्या समाजाची मानसिकताही या प्रश्नांतूम घडत व बिघडत असते. लेखक, कवी आपल्या काळातील अशा प्रश्नांना, आपल्या लेखनाच्या परिघात सामावून घेत असताना समकालीन समाजाची अधोरेखित करीत असतात. कोकणात आज लिहिली जाणारी कविताही याला अपवाद असलेली दिसत नाही.

कोकणातल्या आजच्या समाजवास्तवात विविध प्रकारचे संक्रमण होऊ पाहत आहे. ह्या संक्रमणाचे मूलस्तोत्र अन्य ठिकाणच्या मूलस्त्रोताहून काही भिन्न आहेत असे नाही. जागतिकीकरणाचा समजजीवनावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष होत असलेला परिणाम, त्यातुन उद्भवलेला संगणक, मोबाईल आदी डिजीटल साधनांचा वापर माणसांच्या जीवनात वाढत चाललेला दिसतो. इथल्या समृध्द प्रदेशावर अर्थकेंद्री बाजारू मानसिकतेची विखारी नजर खिळून राहिलेली दिसते. राजकीय प्रवृत्तीचा प्रभाव खेड्यातील पाड्यापाड्यावर वाढत जाताना दिसतो. वन्य जीवांचे शेतभातावर आक्रमण होत आहे. पर्यावरणाला विनाशकारी ठरणारे प्रकल्प उभारून विकासाचे 'चित्र'

उभे करू पाहणारी राजकीय मानसिकता, इथल्या माणसांच्या मुळावरच उठवलेली दिसते. या सा-या घटनातून कोकणातील आजच्या समाजवास्तव्याचा प्रत्यय घेऊ शकतो. गाव मोडत जाण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. पर्यायाने ग्रामीण संस्कृतीचा लोप होण्याची प्रक्रिया आजच्या काळात, कोकणासारख्या प्रदेशातही गतिमान झालेली दिसते.

या वास्तव्याविषयी सजग राहून लिहील्या जाणा-या कवितेचा विचार करताना काही कवींची नावे समोर येतात. ती म्हणजे - प्रवीण बांदेकर, वीरधवल परब, अजय कांडर, शरयु आसोलकर, अनिल धाकू कांबळी, सिध्दार्थ विष्णू तांबे, उत्तम पवार, गोविंद काजरेकर आणि नामदेव गवळी इत्यादी याविषयी उषा परब, संध्या तांबे, हर्षवर्धिनी जाधव, अनिल कांबळी, विठ्ठल कदम, मधुकर मातोंडकर अशा आणखी काही कवींचा समावेश येथे करता येईल. अर्थात यातील बहुतांश कवींची कविता पूर्णतः प्रादेशिक आहे असे नाही. यातील कवी आपली प्रादेशिकता जपतानाच, आजच्या एकूणच वर्तमानाची चित्रलिपी वाचणारे आहेत ते निश्चितच.[२]

या पार्श्वभूमीवर प्रा. भाऊसाहेब गोसावी, डॉ. सई लळीत, प्रा. नामदेव गवळी यांची कविता वाचताना चटकन जाणवते ते एकंदरीतच सिंधुदुर्गातल्या आजच्या कवितेतून तिचे असलेले वेगळेपण केवळ बोलीच्या समर्थ वापराचेच नव्हे, तर बोलीच्या माध्यमातून इथल्या मातीशी आणि भाववृत्तीसी इमान राखणा-या वैशिष्ट्यपूर्ण आविष्काराचेही आहे. जगणं आणि शब्दांच्या माधमातून ते व्यक्त करणं, लिहिण यात कमित कमी अंतर असणारी कविता आजच्या लिहिल्या सिंधुदुर्गात अभावानेच आढळते. मराठीच्या मुख्य प्रवाहाला कोणतीही योगदान न देणा-या, काळाचे भान हरवलेल्या शब्दांच्या भुलैयात हरवलेल्या साचेबंद सिंधुदुर्गीय मालवणी कविता वेगळी ठरते.

प्रा. भाऊसाहेब गोसावींच्या मालवणी मुलाखाची कवितांचा सर्वाधिक समावेश केलेल्या आहे. या कवितांमध्ये मालवणीतील बोली वैशिष्ट्यांप्रमाणेच मालवणी प्रदेशातील नवनवीन चालीरीती, संस्कृती, परंपरा यांच विलोभनीय दर्शन घडतं. प्रादेशिक लेखनातील जनजीवन प्रातिनिधिक स्वरूपाच असावं लागतं. उत्कृष्ट प्रादेशिक लेखनाची ती एक खरीखुरी कसोटीच असते. या कसोटीला प्रा. गोसावी यांची रचना शंभर टक्के उतरली आहे.[३] असे म्हणता येईल.

त्यांच्या हंसा भावीण या कवितेत कोकणातील देवदासी प्रथेविषयी दुःख मांडताना -

देवासकट सगळांका सांगतंय
देवाशी लगीन करूचय नाय
बापाशी बरोबर चेडवाचा लगीन
मेल्यांनो! तुमका कळत कसा नाय.
तुमका गुळ-खोब-याची चटक
देवाचा काय?
अंधारात कोणाच्याच पोटावर
ठेवतस पाय

येथील रुढी परंपरेचा आढावा घेताना, इथली मंदिरे, इथला परिसर अनेक देवदेवतांनी भारलेला असतो. इथला माणूस धार्मिक, अंधश्रध्दाळू, देवदेवस्की व भुताखेतांवर विश्वास ठेवणारा आहे. इथली बारा-पाचांची

मर्यादा, अंगात येणारी वारी, त्यांच्या हातातील लाकडी मलंग, या लाकडी मलंगावरील देवाचे मुखवटे, मूर्ती-पाषाणे, चित्रे-चिन्हे, निशाने, पालखी या सा-या गोष्टी गावगाड्याच्या संस्कृतीला बांधून थेवणा-या मात्र मंदिराच्या आटील व बाहेरील मूर्ती त्यांच्या हातातील ढाल-तलवार, खंजीर, त्रिशुल, शंख, हत्ती, घोडे, रथ या गोष्टी प्राचीन काळातील योध्द्यांची व इतिहासाची साक्ष देतात. गोसाविंच्या बहुतांश कविता या आत्मनिवेदनात्मक पध्दतीने येतात. यामध्ये खडपकराची म्हातारी, चाकरमानी गाव सोडून जाताना, गाव सप्त्यात .... टाळ पडलो या कवितांचा उल्लेख करता येईल.

डॉ. सई लळीत यांच्या 'वांगड' काव्यसंग्रहात मालवणी कवितातुन प्रकट झालेले समाज जीवन व त्यातील ताणेबाणे प्रत्ययाला येतात. चाकरमानी या विषयांवरील कवितांमध्ये असाच कोकणी आशय प्रतिबिंबीत झालेला आहे.[४] इथल्या घरापासून एकेक चाकरमानी आढळून येतो. तो घरादारापासून मुलांबाळांपर्यंत दूर असतो. त्याच्या येण्याकडे सारे घर डोळे लावून असतो. तो कधीतरी रजा घेऊन, होळी, गणपतीचा मुहूर्त पाहून गावी येतो आणि 'आज घरवाले येतले' म्हनत त्याची जिवाभावाची सोबत असोशीने हरखून जाते. सई लळीत यांनी घरोघरी येणारे चाकरमानी आणि त्यांची प्रतीक्षा नेमक्या शब्दात टिपली आहे.

त्यांच्या 'शबय' कवितेत प्रेमाचा अस्सल खुळगेपणा पहावयास मिळतो. त्या म्हणतात-

माझी नजरबंदी होता
रुप बाईचा असला तरी डोळे पुरूषाचेच असतात राधे....!
'तुझ्या हातीत आरत' पण डोळ्यानीच ववाळतस
तुझो हौशी घो रुबाबात शंभर रुपये तळीत घालता
त्या कागदाकडे बघताना माका हसाक येता.
मी मनातल्या मनात तुझ्या पुढच्या जन्माची शबय मागतय.
आणि डोळे तळयेत ठेवन पुढच्या घराकडे वळतय.

जगणं आणि शब्दांच्या माध्यमातून ते व्यक्त करणं, लिहिणं यात कमीत कमी अंतर असणारी कविता आजच्या लिहीत्या सिंधुदुर्गात अभावानेच आढलते. मराठीच्या मुख्य प्रवाहाला कोणतेही योगदान न देणा-या, काळाचे भान हरवलेल्या, शब्दांच्या भुलैय्यात, साचेबंद सिंधुदुर्गीय रचनांच्या जंजाळात म्हणुन नामदेव गवळींची कविता तिच्या सच्चेपणाच्या सुरामुळे वेगळी ठरते. कवितेसारख्या अत्यंत संवेदनाक्षम वाङमय प्रकारात भाषा आणि तिच्या शब्दकलेच्या नियोजनाचे काटेकोर भान कवितेत असणे अत्यंत आश्यक असते. काव्यांतर्गत आशयचे सूक्ष्मातिसूक्ष्म कंगोरेही शब्दबध करताना भाषेच्या बारकाव्यांवर हुकमत असणा-या शब्दप्रभुंचीही दमछाक होताना दिसते. त्यातुनच मग शब्दांची, भाषेची मोडतोड, प्रतिमांचा वापर कवीला आवश्यक वाटतो. श्री गवळी यांच्या कवितेतील आशयाला नेमकेपणाने अभिव्यक्त होन्यासाठी प्रमाण मराठी भाषेच्या मर्यादा जाणवल्यानेच कविता बोलीचा वापर करणे अपरिहार्य वाटले असावे. कोकणी लोकजीवनाची सर्व वैशिष्ट्ये इथल्या लोकरीती, श्रध्दा, परंपरा, स्त्रीजीवन, शेतकरी जीवनातील बारकावे, बोलिच्या सर्व लकबींच्या अत्यंत लवचिक वापरातुन गवळी यांनी त्यांच्या कवितांतुन दाखवून दिले आहे.

नामदेव गवळी यांच्या बहुतांश कविता या आत्मनिवेदनाच्या स्वरूपात व्यक्त होतात, त्यांना 'मी' आणि 'तू', 'आम्ही' आणि 'ते' मधील संवादाचे रूप प्राप्त झालेले दिसते. हा निवेदकही वेगवेगळ्या रुपात

भेटत राहतो. तर कधी शेतक-यांच्या रुपात आपली कैफियत ऐकवतो (भातालय), कधी रांगड्या प्रियकराच्या रुपात सखीशी संवादही ('कळ' 'दिष्ट' 'मतिर कारनी'), कधी जन्मजात दारिद्र्याच्या शापाने निघून भरडून निघालेल्या 'व्हनीबाय'च्या रुपात फुंकर घालतो. तर कधी श्रध्दा परंपरेच्या जोखडात संसाराची स्वप्ने उध्द्वस्त झालेल्या 'भावनी' च्या मुखाने गाऊन अस्वस्थ करतो.

भाषे इतकेच इथल्या समाजपूरूषाने वर्षानुवर्षे जोपासलेल्या काही वृत्ती विशेषांतही या भूमीचे वेगलेपण असल्याचे जाणवते. काही विशिष्ट लोकसंकेत, दैवशरणता, भुतेखेते, देवचार, दशावतारासारखी लोकनाट्य, बारापाचाची मानकरी यासारखी लोकजीवनाचा अविभाज्य भाग बनलेली वैशिष्ट्ये कवीच्याही भाववृत्तीचाच भाग बनून गेल्याने निवेदनाच्या ओघात आपसुकपणेच व्यक्त होत राहतात. उदा. 'भातालय' या कवितेतील निवेदकाला रोजच्या दोन वेळच्या घासांसाठी कराव्या लागणा-या कष्टांची जाणीव आहे. त्याविषयी सांगताना तो म्हणतो, 'आमच्या घामट्यावरच येता रुजान सगळा शॅत..., आमच्याबरबर ओडी काडता घरचा आमचा जॉत...' आणि हे सांगत असताना नकळतच, 'दिनारो तो असता आमी निसतो घाम गाळतो, हे नियतिशरण 'मा फलेषु कदाचनम' तत्त्वज्ञान जगण्यातील अपरिहार्यता म्हणूनच जणू स्वीकारल्यचे जाणवून येते. त्याचप्रमाणे, 'देसरूडीची देवपाना करून भुताखेतांका गप बसयतो... शॅतावल्या राखनदाराक मानापरमान उपार देतो' यासारख्या ओळीतूनही आपण कष्ट करून मिळविलेल्या घासातला चराचरातल्या अदृष्टाचाही वाटा काढायची पिढीजात शिकवण, तसे न केल्यास होणा-या संभाव्य परिणामांच्या भीतीचा मनावर असलेला पगडा, भुताखेतांच्या शांतवनासाठी केले जाणारे देसरूड, वाडवळ यासारखे प्रकार यांविषयीही कवी खूप कांही सांगून जातो. पंचमहाभुतांचा, देवदेवस्किचा मालवणी मनावरचा हा पगडा गवळींच्या अनेक कवितांतून सहजभाव म्हणून प्रकटतो. उदा. 'देसरूढाच्या ढोलासारखे दंव सारखो पडताहा' (राखण) 'कालू हुन्ता गावातले देवपानाक यिल्ले... उतरून घेवन तुज्यांवरसून न्हंयकडे गेल्ले' (कळ), 'आस्ता काय हो सत्व तरी घेतास ज्यचा न्हावान' (भवानी)

छोट्या-छोट्या गोष्टीतून अबोलपणे व्यक्त केलं जाणारं प्रेम हेही मालवणी माणसाची शिव्या आणि भांडणाइतकच खासियत. निसर्गावरील प्रेम, नवराबायकोचं परस्परावरील प्रेम गवळींच्या अनेक कवितांतून जाणवतं. उदा. 'तिच उज्वो हात अस्ता', 'कारभारनीच्या जीवाभावाची आबोलीची रोपा असतत', 'बैल आमचे भावबंद आस्तत अर्धी पेज तेंका दितो' (भातालय)

दक्षिण कोकणातील खेड्यातील शेतक-यांचे जीवनदर्शन घडविणारी भातालय ही कविता ठरते. कोकणी माणसांचे कलाप्रेम-नाटकांसाठी गावोगाव तुडवित जाणं, प्रसंगी कर्ज काढून सण साजरा करण्यची मनोवृत्ती, साधी राहणी, माश्याभाताचा आहार, मातीची घरे, अंगणातला मांडव, पाठीमागचे परडे, मांगर, खोपी, कवाथे, काजु-फणसांच्या झाडांच्या बरोबरीने, खळ्यात वाढवलेली आबोलीची रोपटी, सगळ जगण्याचे तपशील जिवंत, करीत असतानाच चटका लावणारा शेवट येतो. मातयेत जगतो मातयेत हसतो जलमाचीच माती करतो... जलमदित्या परमेश्वराक मातयेतच जलम मागतो...'

'राखण' ही कविता असंच वास्तवदर्शी चित्र उभं करते. शेतक-याच्या जगण्याचा एक भाग, शेताची राखण, पण त्यावेळी येणारे अनुभव कवी व्यक्त करतो तेव्हा ती राखण अवघ्या आयुष्याचीच राखण बनुन जाते. कधीतरी ही भयावह 'रात्र' सरेल आणि फटफटत उजाडेल हा आशावाद केवळ पांडग्या सावताचाच असतो; तर अवघ्या कोकणी मनाचा असतो, या कवितेतील नादचित्रेही लक्षणीय ठराविक अशी आहेत.

'व्हनीबाय' या कवितेत चितरलेली मालवणी मुलुखातील स्त्रीसुध्दा प्रातिनिधीक ठरावी. विड्या फुंकत आयुष्यही फुटुंन टाकणारा नवरा, पेजेच्या आशेवर ताटकळणारी पोरं नि दिवसभर कुटूंबासाठी खस्ता खाणारी व्हनीबाय. काडीकाठी जमवून घरटं जपणारी, लाकडाचे भारे, गवताचे भारे, कंदमुळं, भाजीपाला, अंडी, केळी घेवून बाजारात घामाघूम होत येते तेव्हा अंगाला अंग घासनारे उंडगे भेटतात, त्यांच्याशी दोन हात करायची हिंमत असुनसुध्दाच चव्हाट्यावर बोंबाबोंब नको म्हणून मर्यादा जपणारी, पोटात भूक असतानाही रुपयासुध्दा खर्चायला तयार नसलेली, एस.टी. टाळून मैलोनमैल चालत जाऊन रुप्या वाचवणारी, एकट्यानं घर सारवणारी 'व्हनीबाय' चराघरात दिसून येते.

'भावनी'मधी भेटणारी स्त्रीसुध्दा अशीच दुःखात पिचलेला, देवाच्या नावाने 'सवासनीचा टिळो' लावणारी देवाशी लग्न लावलेल्या या भाविणीची चित्र मराठी साहित्यात येतात तीही बेव्हंशी रोमँटिक पध्दतीने प्रेमकथांच्या स्वरुपात. मात्र याची समाजशात्रीय दृष्टीकोनातून 'पायलीभर भातासाठी' आवाठ हिंडून 'पायाचे वाती करून घेणारी, गाववाल्यांचे सवसार' बघुन काळजी भरून येणारी आणि 'आमका भोगून गावकारनीचा कुकुम घट रवता' अशी स्वतःच्याच मनाची 'काजळरातीक आजनासारा' उमाळणारी ही भाविण मराठी कवितेत बहु दा पहिलीच असावी.

एकतर्फी प्रेमाचे, विकल प्रेमाचे चित्रण करणा-या तरीही मनामध्ये कोणताही कटूता न बाळगता 'काजळाकडे तरीय आता' तुजा माजा अढळ नाता' असं म्हणणारा 'खुळगा' प्रेमवीरही या कवितेत वारंवार भेटतो. 'खेळे' ही कविता या दृष्टीने अत्यंत लक्षणीय वाटते. तिच्याविषयीची वाटणारी ओढ, तिला 'दिष्ट' लागेल सगळ्यांच्याच नजरा काय चांगल्या नसतात म्हणून जपणं, गावभर बभ्रा, होऊन घराघराचं 'फुतफुतणं', आवशी-पावशीणं' मुंबै किंवा शहरगावी नेऊन गुपचूप पोरीला उजवणं, तरीही नंतर कधीतरी माहेरी आलेली ती तुसती दिसल्यावरही त्यांच भरून येणं... ही निखळ प्रेमभावणा, सुडाचा लवलेशही नसलेली मालवणी वृत्तीचाच एक भाग असावी. 'ओलावण्यापरास पालावणा हेंच जगात खरा आसा' अशी स्वतःची समजूत काढीत 'तुझ्या हातच्या कॉपभर चायत साकार सस्ती झाली हॅ काय थोडा व्हता' असं म्हणत निरोप घेणं, हा खुळेपणा मालवणी माणूसच करू शकतो.

आत्यंतिक जीवननिष्ठा हा मालवणी समजमनाचा स्थायीभावच आहे. म्हणून कदाचित जीवन नाकारणारे किंवा आध्यात्मिक नि;संग वृत्तीने जिवनाला पॅसिव्हपणे सामोरे जाणारे मन या कवितेत दिसत नाही. त्यातील श्रध्दा, निष्ठा या तर्कावर आधलेल्या नाहीत तर नैसर्गिक जिवनानुभवावर आधारलेल्या आहेत. म्हणुनच दुःख, दारिद्र्य, वैफल्य वाट्याला येऊनही मातीतील माणसे चिवट जीवन लालसेने जगत राहतात. 'भातालय' मधील शेतकरी 'व्हनीबाय' 'भावनी' 'सवसार' मधील स्त्रिया, 'खेळे', 'पावला पावलाक', 'बरीच मगे', 'कळ' मधील प्रेमवेडे याचीच प्रातिनिधिक उदाहरणे ठरतात.

नामदेव गवळींची कविता ही ख-या अर्थाने इथल्या मातीतून रुजून आलेली स्वयंभू कविता आहे. अत्यंत सहज सुरात, लोकगीतांची लय सांभाळत जाणारी ही कविता बोलीतल्या म्हणी, वाक्यप्रचारांचाही वापर तितक्याच सहज नैसर्गिकपणे करते. उदा.'भिडा जळणा', वशाड पडली', 'मुठभर मासे दिवचे पण कोंड कोनाक दाखवू ने', 'अंगाचो काटो मोडणा', पायाचो वाती होणे', 'न्हावान घेणे', 'घरचा पारा कोसळणे', 'भिडे जळणे' सारखे लोकसंकेत अत्यंत सूचक रूपात येतात. त्यावरही स्वतंत्र विचार होऊ शकतो. आबोली-सुरंगीच्या वासाबरोबर शेणामातीचा वास घेऊन आलेली ही कविता ख-या अर्थाने सिंधुदुर्गाची आजची कविता ठरते. इथले अनुभव आणि इथली भाषा असे अद्वैत नामदेव गवळींच्या कवितेव्यतिरीक्त अन्य सिंधुदुर्गीय कवितेत

क्वचितच आढळून येते. बोलीतील उच्चार सौंदर्य अत्यंत प्रभावीपणे लिपिबध्द करून नामदेव गवळींच्या कवितेने सिंधुदुर्गातील कवितेच्या चळवळीला फार मोठे योगदान दिले आहे. यात शंकाच नाही.[५]

नामदेव गवळी हे आपल्या जाणिवा-संवेदना बोलीतून प्रखरपणे व्यक्त करतात. प्रादेशिक बोलीचा समर्थ आविष्कार नामदेव गवळींच्या कवितेत झालेला दिसतो. कोकणी माणसाच्या लोकरीती, श्रध्दा, परंपरा, येथील कृषीजीवन, शेतक-यांचे लोकविधी, दारिद्र्याचे भोग भोगणा-या स्त्रियांचे हलाखीचे जीवन, गवळी यांच्या कवितेच्या केंद्रस्थानी असलेले दिसते.[६] प्रदेशाला एक 'चेहरामोहरा' असतो, हे त्यांच्या कवितेतून ठळकपणे जाणवतो. भोवतालच्या साठीमारीच्या वास्तवात साधे सरळ जीवन जगताना आपली कशी असह्य घुस्मट होत गेली, विनाअनुदान संस्कृतीने आपला कसा बळी घेतला आहे. आपल्याला कसा संघर्ष करावा लागला याविषयी गवळी लिहितात-

थंडयेन कुडकुडलो भर यात्रेत पटार हरलो विडयेक म्हाग चायची पन पत नाय
पदयेनस श्यात तोडला आपल्यापासून कपाळांवर चौकसार संवसारबिवसार चाकरी करापली
झिरो बजेट तेतुर लाखाचे रेट पावला पावलाक संपनांची रकारका जाली.
दादग्यान जाम कमायला सो-या मटक्यावर बंगली गाडी पंचायतीची पदा घरा यीली
आमची पेजेवयली नेटसेटगिरी शेपाश्चात मास्तरकीची अब्रू घेवन गेली.

शिक्षण घेऊनही अनेक तडजोडी करीत जगावे लागल्याची खंत, बोलीतूनही किती समर्थपणे व्यक्त करता येते याची प्रचिती नामदेव गवळी यांची कविता देते.

## समारोप

परंतु मराठी ग्रामीण कवितेत मालवणीचे योगदान तितकेच महत्त्वाचे आहे. ग्रामीण कवितेच्या इतिहासात फार मोठी मालवणी परंपरा नसली तरी येथील जनजीवनाचा व त्यांच्या सुखदुःखाचा विचार करणारी ही कविता आहे. असे म्हणावे लागेल. ज्या बोलीभाषेत सशक्त साहित्य निर्माण होते त्याला भवितव्य उज्वल आहे असे म्हणतात. म्हणून असे म्हणता येईल की आता पर्यंत मालवणी बोलीच्या कवितेत व्यक्त झालेले जीवनविशेष हे अस्सल जीवनानुभव आहे.

## संदर्भः-

१) पयल्या मनाच्या गावकाराच समर्थ आविष्कार-प्रविण बांदेकर-दै.पुढारी
२) मिळून आपण सारे- प्रा. डॉ. गोविंद काजरेकर पृ. ११८
३) मालवणी मुलुखाची कविता- डॉ. गंगाधर महांबरे. पृ. ६
४) वांगड- डॉ. सई लळीत पृ. ३
५) पयल्या मनाच्या गावकाराच समर्थ आविष्कार-प्रविण बांदेकर-दै.पुढारी
६) मिळून आपण सारे- प्रा. डॉ. गोविंद काजरेकर पृ. ११८